**महात्मा ज्योतिबा फुले जल व भूमी संधारण अभियान २०१४-१५ मधील अनुषंगिक खर्चासाठी राष्ट्रीय कृषी विकास योजनेतून निधी उपलब्ध करून देण्याबाबत**

## महाराष्ट्र शासन

## जलसंधारण विभाग

शासन निर्णय क्रमांकः मफुअ-२०१४/प्र.क्र.४४/जल-८

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

तारीख: **२३ मे, २०१४.**

<u>वाचा —</u>

शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्रमांक:

**१)** जलसं-२००२/प्र.क्र.५८१/जल-७, दिनांक २८ फेब्रुवारी, २००२.

**२)** जलसं-२००२/प्र.क्र.६७०/जल-७, दिनांक २९ नोव्हेंबर, २००२.

**३)** जलसं-१००३/प्र.क्र.७९/जल-८, दिनांक १८ जून, २००३.

**४)** जलसं-१००४/प्र.क्र.४७/जल-८, दिनांक २४ ऑगस्ट, २००४.

**५)** जलसं-१००४/प्र.क्र.४७/जल-८, दिनांक १४ सप्टेंबर, २००५.

**६)** जलसं-१००५/प्र.क्र.९५/जल-८, दिनांक २४ फेब्रुवारी, २००६.

**७)** जलसं-२००६/प्र.क्र.१३४/जल-८, दिनांक ५ एप्रिल, २००७.

**८)** जलसं-२००८/प्र.क्र.३१/जल-८, दिनांक १८ सप्टेंबर, २००८.

**९)** जलसं-२००८/प्र.क्र.३१/जल-८, दिनांक २० फेब्रुवारी, २००९.

**१०)** जलसं-२००९/प्र.क्र.३४/जल-८, दिनांक १ जुलै, २००९.

**११)** जलसं-२०१०/प्र.क्र.१३/जल-८, दिनांक १८ मार्च, २०१०.

**१२)** जलसं-२०११/प्र.क्र.१६/जल-८, दिनांक ३० मार्च, २०११.

**१३)** मफुअ २०१२/प्र.क्र.३७/जल-८, दिनांक २८ मार्च, २०१२.

**१४)** मफुअ २०१३/प्र.क्र.६२/जल-८, दिनांक ०५ एप्रिल,२०१३.

**१५)** मफुअ २०१४/प्र.क्र.३०/जल-८, दिनांक ७ मार्च, २०१४.

**१६)** कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र. राकृवि ०५१४ / प्र.क्र.२४ / राकृवियो दिनांक २२ मे २०१४

**१७)** संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन यांचे पत्र क्र. मृदसं-२०१४/मफुजभूअ/प्रस्ताव-२०१४-१५ /न.क्र. १ / मृद-३ / ६६४/२०१४ दिनांक ०७ एप्रिल २०१४.

**प्रस्तावना —**

राज्यातील पर्जन्याधारित कोरडवाहू शेतीसाठी पाणलोट व जलसंवर्धन माध्यमातून सिंचनासाठी पाण्याची उपलब्धता वाढविणे, अत्यंत मौल्यवान असे पाणी व माती यांचे संवर्धन करणे, पडीक जमिनीचा विकास करणे, रोजगार उपलब्धतेत वाढ करणे आणि पर्यायाने कृषि उत्पादनात वाढ करुन मौल्यवान भूसंपत्तीमध्ये स्थायी स्वरुपाची सुधारणा करणे याकरीता महात्मा ज्योतिबा फुले जल व भूमी संधारण अभियान राज्यात दिनांक १ मे, २००२ पासून सुरु करण्यात आले. हे अभियान प्रामुख्याने स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था तसेच ग्रामीण भागातील जनतेच्या लोकसहभागाद्वारे राबविण्यात येत आहे. लोकसहभागातून राबविलेल्या या अभियानाचे ठोस यश पाहता हे अभियान सन २००२-२००३ पासून सातत्याने पुढे राबविण्यास शासनाने मंजुरी दिली आहे. संदर्भाधीन दिनांक ०७ मार्च, २०१४ च्या शासन निर्णयान्वये हे अभियान सन २०१४-१५ मध्ये राबविण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. या अभियानास आजपर्यंत निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला नाही. तथापि, ख-या अर्थाने या अभियानास सन २०११-१२ पासून राष्ट्रीय कृषि विकास योजनेतून निधी मिळण्यास सूरुवात झाली आणि त्याचे भौतीक सदृष्य परिणाम दृष्टीपथात येवू लागले. सन २०१४-१५ मध्ये या अभियानास राष्ट्रीय कृषि विकास योजनेतून प्राप्त झालेले अनुदान वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय—**

कृषि व पदुम विभागाने महात्मा ज्योतिबा फुले जल व भूमी संधारण अभियानासाठी संदर्भाधीन क्र. १६ येथील दिनांक २२ मे २०१४ च्या शासन निर्णयान्वये रु.२५.०० कोटी अनुदानास मंजुरी दिलेले आहे. संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन यांच्या संदर्भाधीन क्र.१७ येथील पत्रातील शिफारसी प्रमाणे हे मंजूर अनुदान जलसंधारण विभाग / लघुसिंचन विभाग व जिल्हा परिषदेच्या विविध योजनेमधून बांधण्यात आलेल्या सिमेंट नाला बांध व माती नाला बांधाच्या दुरुस्तीवर, पाझर तलाव, गाव तलाव आणि पिण्याच्या पाण्याचे स्त्रोतांची दुरुस्ती व बळकटीकरण करणे या बाबीसाठी खर्च करण्यास जिल्हाधिकारी यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

२.दिनांक २३ मे २०१३ च्या शासन निर्णयान्वये दिलेल्या सूचना क्रमांक ०६ (सहा) कायम ठेवून सन २०१४-१५ मध्ये जलस्त्रोतातील गाळ लोकसहभागातून काढण्यात यावा.

३. ज्या सिमेंट नाला बांध व माती नाला बांधाची, पाझर तलाव, गाव तलाव आणि पिण्याच्या पाण्याचे स्त्रोतांची दुरुस्ती आवश्यक आहे आणि त्यात गाळ साचलेला आहे त्यातील प्रथम साचलेला गाळ प्राथम्याने लोकसहभागातून काढावा तद्नंतर वितरीत शासन निधीतून दुरुस्ती करावी.

४. प्रत्येक तालूक्यातून कमीत कमी ०७ (सात) जलस्त्रोत दुरुस्ती करण्यासाठी प्रत्येक तालुक्यास रु. ०६.९४ लक्ष प्रमाणे ३३ जिल्ह्यातील ३५३ तालुक्यास रु. २४४९.८२ लक्ष अनुदान आणि प्रचार प्रसिध्दीसाठी रु. ५०.१८ लक्ष असे एकूण रु. २५००.०० लक्ष खर्च करण्यास शासन मंजुरी देण्यात येत आहे.

५. सदर निधी खर्च करण्यास आयुक्त कृषि महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या अधिनिस्त ठेवण्यात येत आहे. त्यांनी सदर निधीचे वाटप जिल्हाधिकारी यांना करावे आणि ज्या उद्दिष्टासाठी निधी वितरित केला आहे त्याच कामावर खर्च होणार याची दक्षता घ्यावी.

६. हा निधी खर्च करण्यासाठी आयुक्त, कृषि यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. याबाबतचा भौतीक व आर्थीक प्रगती अहवाल आणि खर्चाचे उपयोगीता प्रमाणपत्र शासनास वेळेत सादर करावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०५२३१५२५१०७७२६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( शं. त्र्यं. जाधव )**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,
३. मा.उप मुख्यमंत्री यांचे सचिव,
४. मा.विरोधी पक्षनेते विधान परिषद यांचे सचिव,
५. मा.विरोधी पक्षनेते विधानसभा यांचे सचिव,
६. मा.मंत्री (जलसंधारण), यांचे खाजगी सचिव
७. मा.राज्यमंत्री, (जलसंधारण) याचे खाजगी सचिव
८. सर्व मा.मंत्री, राज्यमंत्री याचे खाजगी सचिव,
९. कार्याध्यक्ष, आदर्शगांव संकल्प व प्रकल्प समिती,
१०. मुख्य सचिव यांचे सहसचिव,
११. सर्व अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालयीन विभाग,
१२. प्रधान सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. सर्व विभागीय आयुक्त,
१४. आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे,

१५. संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१६. सर्व संचालक, कृषि आयुक्तालय, पुणे,
१७. मुख्य अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर), पुणे
१८. प्रधान मुख्य वनसंरक्षक व संचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१९. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे,
२०. सर्व जिल्हाधिकारी,
२१. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
२२. सर्व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
२३. सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
२४. सर्व उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय ( सर्व),
२५. सर्व विभागीय कृषि सहसंचालक,
२६. सर्व अधीक्षक अभियंता, पाटबंधारे,/ सर्व अधीक्षक अभियंता, लघु पाटबंधारे, (स्थानिक स्तर)
२७. संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई,
२८. महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई (प्रसिध्दीकरीता ),
२९. सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,
३०. सर्व मुख्य वन संरक्षक व उपसंचालक, सामाजिक वनीकरण वृत्ते,
३१. सर्व सहसंचालक, सामाजिक वनीकरण वृत्ते,
३२. सर्व मुख्य वनसंरक्षक,/ सर्व उपवनसंरक्षक,
३३. वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,
३४. महाराष्ट्र राज्य जलसंधारण सल्लागार परिषदेचे सर्व अशासकीय सदस्य,
३५. महालेखापाल, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य १ व २, मुंबई व नागपूर,
३६. महालेखापाल, (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य १ व २, मुंबई व नागपूर,
३७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
३८. सर्व मंत्रालयीन विभाग,
३९. कार्यासन अधिकारी (राकृवियो कक्ष), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
४०. संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
४१. सर्व उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, (जलसंधारण उप विभाग),
४२. मंत्रालय, मुंबई-३२.
४३. जल-८ (निवड नस्ती), ग्रा.वि.व ज.सं.विभाग, मंत्रालय, मुंबई

**महत्वाचे पत्र**

**जा.क्र.मृदसं/मज्योफुअ/राकृवियो/२०१४-१५/**
**न.क्र.२/मृद-३/ ९९६/२०१४,**
**मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन,**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,**
**पुणे-४११ ००१, दिनांक – १२/६/२०१४.**

**प्रति,**

**१) जिल्हाधिकारी, (सर्व)**

**२) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, (सर्व)**

**विषयः- महात्मा ज्योतिबा फुले जल व भूमी संधारण अभियान २०१४-१५ राष्ट्रीय कृषि विकास योजनेतून निधी उपलब्ध करुन देण्याबाबत. (मार्गदर्शक सूचना)**

**संदर्भः-** १) शासन निर्णय क्र.मफुअ-२०१४/प्र.क्र.३०/जल-८, दि. ७ मार्च २०१४.
२) आयुक्तालयाचे वरील समक्रमांकीय पत्र क्र. ६५९, दि. ५/४/२०१४.
३) शासन निर्णय क्र.मफुअ-२०१४/प्र.क्र.४४/जल-८, दि. २३ मे २०१४.
४) शासन निर्णय क्र.मफुअ-२०१३/प्र.क्र.४९/जल-८, दि. २३ मे २०१३.
५) शासन पत्र क्र. विसअ-२०१४/प्र.क्र.४४/जल-८, दि.२८/५/२०१४.

राज्यातील पर्जन्याधारीत कोरडवाहू शेतीसाठी पाणलोट व जलसंवर्धन माध्यमातून सिंचनासाठी पाण्याची उपलब्धता वाढविणे, अत्यंत मौल्यवान असे पाणी व माती यांचे संवर्धन करणे, पडीक जमिनीचा विकास करणे, रोजगार उपलब्धतेत वाढ करणे आणि पर्यायाने कृषि उत्पादन वाढ करुन मौल्यवान भूसंपत्ती मध्ये स्थायी स्वरुपाची सुधारण करणे याकरीता महात्मा ज्योतिबा फुले जलभूमी संधारण अभियान राज्यात दिनांक १ मे २००२ पासून सुरु करण्यात आले आहे. हे अभियान प्रामुख्याने स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था तसेच ग्रामीण भागातील जनतेच्या लोकसहभागाव्दारे राबविण्यात येत आहे. सदर अभियान सन २०१४-१५ मध्ये राबविण्यास उपरोक्त संदर्भ क्र. १ वरील दि. ७/३/२०१४ च्या शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आलेली आहे.

तसेच वरील संदर्भ क्र. ३ च्या शासन निर्णयान्वये महात्मा ज्योतिबा फुले जल व भूमी संधारण अभियानासाठी सन २०१४-१५ करीता राष्ट्रीय कृषि विकास योजनेतून रक्कम रुपये २५.०० कोटी निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. सदर शासन निर्णयाची प्रत सोबत सहपत्रीत करण्यात आलेली आहे.

या शासन निर्णयानुसार मंजूर केलेला निधी हा **जलसंधारण विभाग/लघुसिंचन विभाग व जिल्हा परिषदेच्या विविध योजनेतून बांधण्यात आलेल्या सिमेंट नाला बांध व माती नाला बांधांच्या दुरुस्तीवर, पाझर तलाव, गाव तलाव आणि पिण्याच्या पाण्याचे स्त्रोतांची दुरुस्ती व बळकटीकरण करणे या बाबीसाठी खर्च करण्यास जिल्हाधिकारी यांना प्राधिकृत करण्यात आले आहे.**

ज्या सिमेंट नाला बांध व माती नाला बांध , पाझर तलाव, गाव तलाव आणि पिण्याच्या पाण्याचे स्त्रोताची दुरुस्ती आवश्यक आहे आणि त्यात गाळ साचलेला आहे त्यातील प्रथम साचलेला गाळ प्राथम्याने लोकसहभागातून काढावा, तद्नंतरच वितरीत शासन निधीतून दुरुस्ती करावी. तसेच सदर दुरुस्तीच्या कामां बाबतच्या सविस्तर मार्गदर्शक सूचना वरील संदर्भ क्र. २ नुसार देण्यात आलेल्या आहेत.

तसेच दिनांक २३ मे २०१३ च्या शासन निर्णयात दिलेल्या सूचनांप्रमाणे सन २०१४-१५ मध्ये देखिल जलस्त्रोतातील गाळ हा लोकसहभागातून काढावयाचा आहे.

वरीलप्रमाणे उपलब्ध झालेल्या रुपये २५.०० कोटी निधीतून पुढीलप्रमाणे प्रत्येक जिल्हयातील प्रत्येक तालुक्यास रुपये ६.९४ लाख निधी उपलब्ध करुन देण्यात येत असून, प्रत्येक तालुक्यातून कमीत कमी ७ (सात) जलस्त्रोत दुरुस्तीची कामे करणे अपेक्षित आहे.

| अ.क्र. | जिल्हा | तालुक्यांची संख्या | उपलब्ध निधी रु. लाख |
|---|---|---|---|
| १ | ठाणे | १५ | १०४.१० |
| २ | रायगड | १५ | १०४.१० |
| ३ | रत्नागिरी | ९ | ६२.४६ |
| ४ | सिंधुदुर्ग | ८ | ५५.५२ |
| ५ | नाशिक | १५ | १०४.१० |
| ६ | धुळे | ४ | २७.७६ |
| ७ | नंदूरबार | ६ | ४१.६४ |
| ८ | जळगांव | १५ | १०४.१० |
| ९ | अहमदनगर | १४ | ९७.१६ |
| १० | पुणे | १४ | ९७.१६ |
| ११ | सोलापूर | ११ | ७६.३४ |
| १२ | सातारा | ११ | ७६.३४ |
| १३ | सांगली | ९ | ६२.४६ |
| १४ | कोल्हापूर | १२ | ८३.२८ |
| १५ | औरंगाबाद | ९ | ६२.४६ |
| १६ | जालना | ८ | ५५.५२ |
| १७ | बीड | ११ | ७६.३४ |
| १८ | लातूर | ९ | ६२.४६ |
| १९ | उस्मानाबाद | ५ | ३४.७० |
| २० | नांदेड | १६ | १११.०४ |
| २१ | परभणी | ८ | ५५.५२ |
| २२ | हिंगोली | १० | ६९.४० |
| २३ | बुलडाणा | १३ | ९०.२२ |
| २४ | अकोला | ७ | ४८.५८ |
| २५ | वाशिम | ६ | ४१.६४ |
| २६ | अमरावती | १४ | ९७.१६ |
| २७ | यवतमाळ | १६ | १११.०४ |
| २८ | वर्धा | ८ | ५५.५२ |
| २९ | नागपूर | १४ | ९७.१६ |
| ३० | भंडारा | ७ | ४८.५८ |
| ३१ | गोंदिया | ८ | ५५.५२ |
| ३२ | चंद्रपूर | १४ | ९७.१६ |
| ३३ | गडचिरोली | १२ | ८३.२८ |
| | **एकूण** | **३५३** | **२४४९.८२** |

सदरचा निधी संबंधित विभागाकडे जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेने उपलब्ध करुन देण्यात यावा. जिल्हा अधिकारी कृषि अधिकारी यांनी यंत्रणानिहाय, बाबनिहाय भौतिक/आर्थिक साध्याचा अहवाल नियमितपणे आयुक्तालयास सादर करावेत. तसेच खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करावे.

**सोबतः- वरीलप्रमाणे**

**संचालक,**
**मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन,**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,**
**पुणे-४११ ००१.**

**प्रतिलिपी माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव :-**

१) विभागीय आयुक्त (महसूल) (सर्व)

२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद- (सर्व)

३) विभागीय कृषि सह संचालक (सर्व)

**प्रतः-** अवर सचिव, महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीस्तव.